नियमित फौ. ख. क्र. १११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखर
नि.क्र. १५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - चरणजीतसिंग मिलारामजी अरोरा,
वय ६५ वर्षे, व्यवसाय – व्यवसाय,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. दि.१४.०४.२०२४ रोजी पोलीसांनी मला समन्स दिला नव्हता त्यावेळी मी बाजुला राहत असल्यामुळे पोलीस तेथे आले होते. आता मला पंचनामा समन्स दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांनी काय कारवाई केली ते मला आठवत नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.१७** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०४.२०२४ रोजी पोलीसांनी मला शिवाजी लेआऊट येथे पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनाम तयार

केला, मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी शिवाजी लेआऊटला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी शिवाजी लेआऊट येथे जाऊन पंचनाम्यावर सही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व अरोपी पती पत्नी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा फिर्यादीला नेहमी भेटण्याकरिता येत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी तंटामुक्तीचा अध्यक्ष असल्यामुळे मला आरोपी व फिर्यादी यांचे येणे जाणे बाबत मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझ्या घरा शेजारी राहत होता. मला आरोपी व फिर्यादी यांच्या अंतर्गत वादा बद्दल माहिती नव्हती.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २१.०३.२०२५

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.